# प्रेस नोट दि.२२/०४/२०२३

## शिरगाव व तळेगाव हद्दीतील १० लाखाचे गावठी हातभट्टीचे अड्डे उध्वस्त, तसेच मोबाईल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीस व गांजाचे सेवन करणाऱ्या इसमास पिंपरी मार्केटमध्ये घेतले ताब्यात

## अंमली पदार्थ विरोधी पथकाची कारवाई

पिंपरी चिंचवड शहरामध्ये चोरुन व लपुनछपुन होणारी गावठी हातभट्टी विक्री, साठवणुक व वाहतुकीस पुर्णपणे प्रतिबंध व्हावा करीता मा. पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो यांनी सुचना दिल्या होत्या त्यानुसार मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे सो व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१ श्री पदमाकर घनवट सो व वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सतिश पवार, अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेतील पोलीस अधिकारी व अंमलदार यांना सुचना दिल्या व मार्गदर्शन केले होते.

त्याप्रमाणे दि.२१/०४/२०२३ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथकाकडील **पोलीस हवालदार प्रदीप शेलार, पोलीस शिपाई मितेश यादव** यांना मिळालेल्या बातमीवरुन शिरगाव ता.मावळ जि.पुणे येथे पवना नदीच्या कडेला छापा टाकुन दोन गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची चालु भट्टी व मातीमध्ये मोठे टाकी सारखे तीन खड्डे तयार करुन त्यामध्ये ताडपत्री ठेवलेली ५,००० लिटर मापाचे दोन व १०००० मापाचा एक खड्डा, त्या खड्ड्यांमध्ये **गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याचे २०,००० लिटर रसायन (कच्चा माल) असा एकुण १०,००,०००/-रु. किं.चा प्रोव्हिबिशन माल** अनाधिकाराने बेकायदेशिररित्या गावठी दारु तयार करण्यासाठी ठेवलेला मिळुन आला. तसेच एकुण १०,५००/- रु. किं.ची ३५ लिटर मापाचे गावठी हातभट्टी तयार दारुचे भरलेले ०३ कॅण्ड मिळुन आले. तो जप्त करण्यात आला आहे. सदरच्या भट्ट्या ह्या ही महिला नामे ज्योती इश्वर राजपुत रा.कंजारभटवस्ती गहुंजे रोड मु.पो.शिरगाव ता.मावळ जि.पुणे व महिला नामे आश्विनी राहुल मनावत वय ३० वर्षे रा.कंजारभटवस्ती गहुंजे रोड मु.पो.शिरगाव ता.मावळ जि.पुणे यांची असल्याची माहीती मिळाल्याने तिचे विरुध्द शिरगाव परंदवडी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच तळेगाव पोलीस स्टेशनच्या हद्दीत टि.जी.एच.डोळयाचे हॉस्पिटल समोर झाडाचे आडोशाला इसम नामे प्रशांत अरुण दुबे, याचे ताब्यातुन एकुण ५,३००/- रुपये किंमतीची गावठी हातभट्टीची तयार दारुचा प्रोव्हि. माल जप्त करुन सदर इसमाविरुध्द तळेगाव दाभाडे पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

**वरील कारवाईमध्ये एकुण २०,००० लिटर गावठी हातभट्टी दारु तयार करण्याचे रसायन व १५८ लिटर गावठी हातभट्टी तयार दारु व दारुच्या भट्टी साठी लागणारे भांडे असा एकुण १०,१५,८००/-रु. किं.चा प्रोव्हिबिशन** माल जप्त केला आहे.

तसेच पिंपरी पोलीस स्टेशन हद्दीमध्ये पोलीस नाईक विजय दौंडकर व प्रसाद कलाटे यांना मिळालेल्या बातमीवरुन इसम नामे अदित्य राम सुर्वे, वय १९ वर्षे, रा पिंपरी भाजी मंडई जवळ, युगंधर चौक, पिंपरी पुणे यास ताब्यात घेवुन अधिक चौकशी केली असता त्याने **पिंपरी पोलीस स्टेशन गु.र.क्र. ४६०/२०२३ भारतीय दंड विधान कलम ३७९** या गुन्हयातील मोबाईल चोरी केल्याचे कबुल करुन त्याचेकडुन गुन्हयामध्ये **चोरीस गेलेला १०,०००/- रु. किं.चा मोबाईल जप्त** करुन सदर गुन्हा उघडकीस केला आहे. सदर आरोपीस पुढील कार्यवाहीकामी पिंपरी पोलीस स्टेशनच्या ताब्यात दिला आहे.

तसेच पिंपरी पोलीस स्टेशनचे हद्दीतील भाटनगर पिंपरी येथे गांजा ताब्यात बाळगुन गांजा सेवन करणाऱ्या नुरजितसिंग उर्फ सनी गुलजारसिंग विरदी रा.मिलिंदनगर पिंपरी, पुणे यास ताब्यात घेवुन त्याचे विरुध्द एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २७ प्रमाणे पिंपरी पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कामगीरी ही **मा.पोलीस आयुक्त, श्री. विनय कुमार चौबे सो, मा.सह पोलीस आयुक्त मनोज लोहीया, मा.अप्पर पोलीस आयुक्त, श्री. डॉ.संजय शिंदे, मा.पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्रीमती स्वप्ना गोरे सो, मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे-१, श्री. पदमाकर घनवट,** यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सतिश पवार, पोउपनि श्री. ज्ञानेश्वर दळवी, पोलीस उप-निरीक्षक राजन महाडीक व पोलीस अंमलदार सहा.पोलीस फौजदार बाळासाहेब सुर्यवंशी, जिलानी मोमीन, पोलीस हवालदार प्रदिप शेलार, राजेंद्र बांबळे, दिनकर भुजबळ, पोलीस नाईक मनोज राठोड, मयुर वाडकर, संतोष भालेराव, विजय दौंडकर, प्रसाद कलाटे, अजित कुटे, पोलीस शिपाई रणधीर माने, मितेश यादव, सदानंद रुद्राक्षे, अशोक गारगोटे, कपिलेश इगवे यांनी केली आहे.

**(स्वप्ना गोरे)**
पोलीस उप आयुक्त, गुन्हे
पिंपरी चिंचवड